ज्येष्ठ भावगीत गायक अरुण दाते ४ मे रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत. आपल्या भावपूर्ण गायकीने रसिकांच्या मनावर राज्य करणारा हा गायक घरात आहे तरी कसा, हे सांगत आहेत त्यांचे कुटुंबीय...

■ ■

आमचे अरुजी

मीना अरुण दाते : मला सुरुवातीपासूनच गाणे खूप आवडायचे. तलत महेमूद हा सगळ्यात लाडका गायक होता. अरुणजी तेव्हा आकाशवाणीवर हिंदी गाणे गायचे. एकदा त्यांचे गाणे लागल्यावर बहीण म्हणाली, की तलतचे गाणे लागले आहे. मी लगेच ओळखले, हा आवाज खूप सुंदर, चांगला आहे, तलतच्या जवळ जाणारा आहे; पण तलतचा नाही. पुढे योगायोगाने अरुणजींची भेट झाली. आमच्यात प्रेम झाले. तेव्हा मी केवळ १६ वर्षांची होते. २ वर्षांनी आमचे लग्न झाले. मला वाटले आपल्या नशिबात हा तलत होता. आमचे घर दादरला असल्याने येणाऱ्या-जाणाऱ्यांचा राबता प्रचंड असायचा. त्यांचे सगळे मी हसतमुखाने करायची. दातेंच्या नावामुळे बाळासाहेब ठाकरे, लता मंगेशकर, आशा भोसले अशा कितीतरी महान व्यक्तींचे प्रेम मलाही मिळाले. माझा अपघात झाला तेव्हा लता मंगेशकर रोज रुग्णालयात फोन करायच्या. हे सर्व मिळाले अरुणजींच्या आवाजामुळे. अरुणजी पहिल्यांदा गझल, हिंदी गीते गायचे. मराठी गीते गायला लागल्यावर हिंदी गाणे थांबले. ते जर हिंदीत गायले असते, तर अधिक वाव मिळाला असता, असे मला आजही वाटते. त्यांच्या अनेक गाण्यांची पहिली श्रोता होण्याचे भाग्य मला मिळाले. या दिवशी माझ्या सासूबाई माणिकबाई यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. देवाइतक्या त्या मला पूजनीय आहेत. आईपेक्षाही त्यांनी मला अधिक प्रेम दिले.

रवी दाते : अरुणदादाला आवाजाची देणगी लहानपणापासूनच लाभली आहे. मराठी भावगीत गायकीतील तो शुक्रतारा आहे. त्याचा आवाज अत्यंत कोमल, स्वरांवर निसर्गतः प्रभुत्व असलेला, सहज असा आहे. तो सुरुवातीला केवळ उर्दू गायचा आणि १९८३ मध्ये 'शुक्रतारा मंदवारा...' हे गीत आले आणि इतिहास रचला गेला. आज एकही कार्यक्रम या गाण्याशिवाय पूर्ण होत नाही. त्या काळी प्रत्येक कलाकाराच्या मनात दीदी ऊर्फ लता मंगेशकर यांच्याबरोबर गाण्याची सुप्त इच्छा असायची. 'संधिकाली या अशा...' गीतात अरुणदादाला ही संधी मिळाली. पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी त्याला संगीत दिले. ते गीत गायिल्यावर दादाची ही सुप्त इच्छाही पूर्ण झाली.

कुटुंबातील व्यक्तींवर प्रेम करणारा, मोठ्यांचा मान राखणारा असा तो दादा आहे. आमच्यात तो कमी बोलतो, तर मी बडबडा आहे. माझ्या डोळ्यावर १९६७ मध्ये शस्त्रक्रिया करण्यात येणार होती; पण तेव्हा वैद्यकीय शास्त्र खूप प्रगत झाले नव्हते. डोळा वाचेल की नाही, असा प्रश्न निर्माण झाला होता. त्या वेळी दादाचे पत्र मला आले. त्यात लिहिले होते, 'डॉक्टरांना सांग, माझा एक डोळा देऊन तू बरा होत असशील तर माझा डोळा घ्या...' असा आहे माझा दादा! ईश्वराच्या कृपेने पुढे सगळे व्यवस्थित झाले. एकमेकांवर प्रेम करण्याचे, जीव लावण्याचे संस्कार घरातच आमच्यावर झाले. आमचे एकमेकांवर इतके प्रेम आहे, की सावलीसारखे आम्ही बरोबर असायचो. तो माझा आदर्श होता. त्यामुळे मी त्याच्या मागेमागेच असायचो. गाण्याच्या कार्यक्रमात तबल्याची साथही केली. त्यामुळे आमचे नाते अधिकच दृढ होत गेले. सगळे लोक त्याचे कलाकार म्हणून कौतुक करतातच; पण भाऊ म्हणून मला असे वाटते, की पुढच्या जन्मीही मला त्याचे भाऊ होणे आवडेल. लहान की मोठा, हे परमेश्वर ठरवेल!

दादाच्या या वाढदिवसाला आमची वहिनी मीना यांचा उल्लेख करायलाच हवा. त्यांनी दादाचा संसार नीटनेटकेपणाने सावरला. कलाकाराची व्यस्तता लक्षात घेऊन मनोभावे सेवा केली, हे उल्लेखनीय आहे. त्यांचे लग्न १९६१ मध्ये झाले. त्या वेळी झालेल्या सांगीतिक कार्यक्रमात स्वतः कुमार गंधर्व यांनी गायन सादर केले होते, याची आठवण सहज मनात येऊन जाते. तेव्हापासून या दोघांचा संसार स्वरांच्या साथीनेच फुलला.

अतुल अरुण दाते : मी इतक्या मोठ्या गायकाचा मुलगा आहे, हे बाहेर गेल्यावरच जाणवते. घरात ते साधेपणाने वागतात. आयुष्यात खूप प्रसिद्धी, पैसा मिळूनही त्यांनी आपले साधे जीवन सोडले नाही. कवी, संगीतकाराबद्दल ते खूपच चोखंदळ राहिले. त्यामुळेच इतके नाव असूनही त्यांनी केवळ १३५-१५० गाणीच रेकॉर्ड केली. हे खरे तर अवघड असते; कारण एकदा पैसा, प्रसिद्धी मिळू लागल्यावर लोकांना गाण्याला नाही म्हणणे जड जाते. मग कशीही गाणी गायली जातात; पण बाबांनी हे निग्रहाने टाळले. चांगल्याच कामाचा आग्रह त्यांनी कायम धरला. त्यांना चांगले संगीत ऐकण्याचा छंद आहे. बेगम अख्तर, कुमार गंधर्व अशा कितीतरी कलाकारांना त्यांनी अगदी जवळून ऐकले आहे. त्यांच्यामुळे आम्हालाही अतिशय मोठ्या कलावंतांना ऐकता आले. प्रत्येक कलाकाराला मग तो प्रसिद्ध असो की नाही, ते खूप मान देतात. लबाडी हा प्रकार त्यांच्या आयुष्यात कधीच नव्हता. त्यांनाही नेहमी चांगलीच माणसे भेटत गेली. त्यांचा मुलगा म्हणवून घेताना कधी कधी टेन्शन येते. त्यांनी इतके काम करून ठेवले आहे, की आपल्यामुळे त्याला कधी धक्का लागणार नाही ना, अशी सारखी धाकधुक असते. वडील म्हणून त्यांनी कधीच धाक दाखविला नाही. उलट खूप प्रेमाने आम्हाला जे करायचे ते करू दिले. जे करशील त्यात सर्वोच्च हो, असाच आशीर्वाद त्यांनी दिला.

ज्योती रवी दाते : आज अरुणदादांची गाणी अनेक जण गातात. नुसतीच ऐकताना ती छानही वाटतात; पण दादांबरोबर ऐकली तर तिथे दादांच्या गळ्यातील वैशिष्ट्य, मोठेपणा अधिक जाणवतो. आज दादांना खूप यश मिळाले; पण ते काही सहज मिळाले नाही. त्यासाठी त्यांनी अत्यंत कष्ट घेतले आहेत. चांगल्या पगाराची, मानसन्मान असलेली नोकरी केवळ गाण्यावरील प्रेमापोटी सोडली. उन्हाळा, पावसाळा, थंडी, धूळ कशाचीही पर्वा न करता अगदी छोट्या छोट्या गावात गाण्यासाठी जातात. एकदा गायला बसल्यावर सगळ्या समस्या, प्रश्न विसरून जातात. अगदी निष्ठेने, श्रद्धेने गातात. त्यांचा हा गुण सगळ्यांनीच आचरणात आणावा, असा आहे. आज गाण्याच्या क्षेत्रात त्यांच्या नावाशिवाय पुढे जाता येत नाही, असे स्थान त्यांनी निर्माण केले आहे. आम्हा कुटुंबीयांना त्यांचा अभिमान आहे.

अजय धोंगडे :तबला वादक म्हणून मी अनेक कार्यक्रमात साथसंगत करीत असतोच. असेच सुमारे २० वर्षांपूर्वी 'शुक्रतारा' या कार्यक्रमासाठी मला साथसंगत करण्याचे सुचवले आणि तिथेच पहिल्यांदा दातेंजीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत आणि मैत्रीचे पुत्रवत् प्रेमात रूपांतर कसे आणि कधी झाले, हे माझे मलाही कळले नाही. त्यातूनच त्यांच्या केवळ राज्यातील नव्हे तर परराष्ट्रातील कार्यक्रमांनाही मी साथसंगत केली. आमचे ट्यूनिंग खूपच छान जमल्याने एका अर्थाने ही मैत्रीची साथ आजही चालू आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव, गाण्याविषयीचे प्रेम, गाण्यासाठीची शिस्त हे खूपच भावते. त्यांना मिळालेली गाणी चांगली आहेतच; पण त्यांच्या या गुणांमुळे ती अधिक खुलतात. गाणे रेकॉर्ड झाल्यानंतर ३०-३५ वर्षांनंतरही तसेच झाले पाहिजे, प्रत्येक जागा तशीच आली पाहिजे, ही शिस्त आहे. त्यामुळे कार्यक्रम खुलत जातो. भावगीत इतकी वर्षे रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी खूप सातत्याने केले. त्यासाठी खूप प्रवास केला. अनेक ठिकाणी काहीच सोय नसायची. ४५-४६ डिग्री सेल्सियस तापमान असायचे; पण गाण्यापुढे त्यांनी या कशाचीच पर्वा केली नाही. उत्तम प्रेक्षक व गाणे उत्तम जुळले की कार्यक्रम उत्तम व्हायचा. कार्यक्रम कोठेही होवो, गर्दी ही ठरलेलीच. त्यांचे गाणे ऐकले नाही, असा माणूस राज्यात सापडणे विरळाच असेल. आमच्या वयामध्ये अंतर असूनही आमच्यात घट्ट मैत्री कशी जमली, हे समजलेच नाही. खरे तर याचे श्रेय त्यांचेच आहे. जगातील सगळ्या चांगल्या गोष्टी या समान असतात, हा त्यांचा विश्वास आहे. त्याच विश्वासाने ते आमच्याशी वागतात. वागण्यात कोठेच 'मी'पणा, किंवा मी खूप मोठा गायक आहे, असे कधीच नसते. अशी भावनाच ते तुमच्या मनात येणारच नाही, इतके ते तुम्हाला जिंकतात. त्यांची विनोदबुद्धी अत्यंत उत्तम. हजरजबाबीपणाही आहे. त्यामुळे गप्पांच्या मैफलीही खूप फुलतात. दोस्ती करणे व ती टिकवणे हा त्यांचा शौक आहे.

आमच्या या मैत्रीतूनच मला आता त्यांचा मुलगा, अशी ओळख करून दिली जाते. हे सगळे आपोआप घडत गेले. हे नाते मलाही खूप आवडते.

स्वरगंगेच्या काठावरती .... अशी सुंदर गीते पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्याबरोबर अरुण दाते यांनी दिली.



बाबांचा वारसा... रसिकप्रिय, दिलदार रामूभय्या दाते यांच्या फोटोसह

मुलगा अतुल याला गाणे शिकवताना.

सुधीर फडके, श्रीनिवास खळे, मंगेश पाडगावकर यांच्याबरोबर अरुण दाते.

बेगम अख्तर यांच्यासमवेत अरुण दाते

नाते आपुलकीचे : पु. ल. देशपांडे व दाते

मनमोकळ्या गप्पा : राजकपूर, बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबर दाते.